**VISHVPRABHA VENTURES LIMITED**
**(Formerly known as Vishvprabha Trading Ltd.)**
Regd. Office : Ground Floor, Avighna Heights, Survey No. 45-4B, Behind Sarvoday Park, Nandivali Road, Dombivili East 421201
CIN : L51900MH1985PLC034965
Website : www.vishvprabhavebtures.com
Email: cosec@vishvprabhaventures.com

Date: August 16, 2022

To,
**BSE Limited,**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai – 400001

**BSE Script Code: 512064**
**Sub: Newspaper publication.**

Dear Sir / Madam,

With respect to the above subject, please find attached herewith the copy of newspaper publication under Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015 for unaudited financial for quarter ended June 2022.

1. Mumbai Financial Express in English language.
2. Pratah Kaal in Regional language i.e. in Marathai.

Kindly take the same on your records.

Thanking You,

**For Vishvprabha Ventures Limited**

**Jas Raj Nagal**
**Company Secretary and Compliance officer**
**Membership No.: A59372**

## VISHVPRABHA VENTURES LIMITED

**CIN No. : L51900MH1985PLC034965**

Office no 04, Avighna Heights, Survey No 45,Near Sarvoday Park, Nandivali Road, Dombivali - 421021.

**Extract of Statement of Unudited Financial Results for the Quarter ended 30th June, 2022.**

**(Rs. in thousands)**

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Year ended | Quarter ended | | | Year ended |
| | | 30.06.2022 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 30.06.2021 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 30.06.2022 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 30.06.2021 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) |
| 1 | Total Income from Operations (net) | 7,156 | 10,709 | 3,132 | 26,961 | 7,156 | 10,709 | 3,132 | 26,961 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 1,915 | (1,852) | 385 | (4,094) | 1,890 | (1,920) | 358 | (4,270) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 1,915 | (1,852) | 385 | (4,094) | 1,890 | (1,920) | 358 | (4,270) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 1,915 | (1,959) | 385 | (4,201) | 1,890 | (2,028) | 358 | (4,377) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 1,915 | (1,959) | 385 | (4,201) | 1,890 | (2,028) | 358 | (4,377) |
| 6 | Equity Share Capital (Face Value Rs. 10/- per share) | 17,150 | 17,150 | 2,450 | 17,150 | 17,150 | 17,150 | 2,450 | 17,150 |
| 7 | Other equity (excluding Revaluation Reserve) | | | | 24,993 | | | | 24,824 |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) (not annualised) | | | | | | | | |
| | a. Basic: | 1.12 | (4.27) | 1.57 | (9.16) | 1.10 | (4.42) | 1.46 | (9.49) |
| | b. Diluted: | 1.12 | (4.27) | 1.57 | (9.16) | 1.10 | (4.42) | 1.46 | (9.49) |

**Notes:**

The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly results is available on the Company's website at www.vishvprabhaventures.com and the Stock Exchange websites at www.bseindia.com.

**For Vishvprabha Ventures Limited**
**(Formerly known as Vishvprabha Trading Limited)**

**Mitesh Thakkar**
**Managing Director**
**(DIN 06480213)**

**Place : Dombivali, Thane**
**Date : 14.08.2022**

## Laffans PETROCHEMICALS LIMITED

**Regd.Office:** Shed No. C1B/316 GIDC, Panoli, Ankleshwar, Gujarat - 394116

**CIN: L99999GJ1992PLC018626**

**Corporate Office :** ONE BKC, 13th Floor, 1302, B-Wing Plot No. C-66, G-Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai-400051. Tel.: 6693 0813/0830.

Email : lplho@laffanspetrochemical.com

**STATEMENT OF FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2022**

Rs in Lacs

| Sr No. | Particulars | Quarter Ended | | | Year Ended |
|---|---|---|---|---|---|
| | | 30.06.2022 | 30.06.2021 | 31.03.2022 | 31.03.2022 |
| 1. | Total Income from Operations (Net) | 1,058.73 | 865.67 | 458.81 | 2,631.18 |
| 2. | Net Profit/(Loss) from ordinary activities after tax | (149.68) | 61.28 | (304.55) | (175.07) |
| 3. | Net Profit/(Loss) for the period after tax | (149.68) | 61.28 | (304.55) | (175.07) |
| 4. | Total Comprehensive Income for the period after tax (Comprising Profit/(Loss) for the period after tax and other Comprehensive Income after Tax | (149.72) | 61.24 | (304.59) | (175.24) |
| 5. | Equity Share Capital | 800.00 | 800.00 | 800.00 | 800.00 |
| 6. | Reserve excluding Revaluation Reserve as per Balance Sheet of Previous accounting year | | | | |
| | Earning Per Share of Rs. 10/- each Basic and diluted EPS | (1.87) | 0.77 | (3.81) | (2.19) |

**Notes:**

1. The above Unaudited results for the quarter ended 30th June, 2022 have been received by the Audit committee and approved by the Board of Directors at its meeting held on 14th August, 2022.
2. The Company current business activities has only one primary reportable segment i.e in trading of chemcials and commodities
3. The financial results of the Company have been prepared in accordance with the Indian Accounting Standards (IND AS) and in terms of regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

**Sd/-**
**Sandeep Seth**
**Managing Director**

Place : Mumbai
Date : 14/08/2022

**CLASSIFIED CENTRES IN MUMBAI**

*Aryan Publicity*
*Parel Village,*
*Phone: 022-65881876*
*Mobile: 9320111876*

*Beejay Ads,*
*Opera House*
*Phone : 23692926 | 56051035.*

*Colour Spot,*
*Byculla (E),*
*Phone : 23748048 | 23714748.*

*Fulrani Advtg. & Mktg.*
*Antop Hill*
*Phone: 24159061*
*Mobile: 9769238274/ 9969408835*

*AZAD Publicity*
*Mumbai Central*
*9821204061*

*KITES Advertising,*
*Tardeo AC Market,*
*Bombay Central,*
*Phone : 66375957/ 8.*
*Mobile : 9324175957.*

*Ganesh Advertising,*
*Abdul Rehman Street,*
*Phone : 2342 9163 | 2341 4596.*

*J.K. Advertisers,*
*Hornimal Circle,*
*Fort.*
*Phone : 22663742.*

**Is your opinion yours?**

Your opinion should belong to you.
A voice that is your own.
Undeterred. Uncompromised. And brave.
A conscience that isn't at peace,
until the truth is uncovered.
A mind that isn't fuelled by
someone else's thoughts.
Where actions are based on informed opinions
and not ignorant assumptions.

Because it's not about going where everyone goes.
Or being part of a trend because it is one.
Or taking sides because you don't know enough.

It's about freedom.
The freedom to have an opinion that's yours.

At Indian Express, we stand by this freedom.
We celebrate it by being unbiased and independent.
And by having a voice that isn't afraid to speak its mind.

#InformYourOpinion


*The Indian* Express.
*For the Indian Intelligent.*



**indianexpress.com**

**The Indian EXPRESS**
JOURNALISM OF COURAGE

# विनायक मेटे यांचे अपघाती निधन




त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी बीडमध्ये अंत्यसंस्कार होणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस नेते अशोक चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनी विनायक मेटेंच्या दुर्दैवी निधनावर शोक व्यक्त केला आहे. विनायक मेटे आपले एक सहकारी आणि बॉडीगार्ड यांच्यासोबत मुंबईच्या दिशेने येत असताना हा अपघात झाला. आज दुपारी १२ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मराठा आरक्षणासंदर्भातील बैठकीसाठी ते मुंबईला येत होते. दरम्यान, विनायक मेटे यांच्या मृत्यूबद्दल काही नेत्यांनी तसेच शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी शंका उपस्थित केली आहे. या अपघातात विनायक मेटे यांचा ड्रायव्हर एकनाथ कदम याला किरकोळ जखम झाली आहे. अपघाताबाबत अधिक माहितीसाठी नवी मुंबई पोलिसांनी ड्रायव्हरला ताब्यात घेतले होते. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्याला आता रसायनी (रायगड जिल्हा) पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. अपघाताबाबत एकनाथ कदम याच्याकडून सविस्तर माहिती पोलिस घेतील. यासंबंधी त्याचा जबाब नोंदवून घेतला जाणार आहे.

विनायक मेटे यांचा अपघात झाला तेथील सीसी टीव्हीदेखील तपासण्यात येणार आहेत.

मेटेंचा ड्रायव्हर एकनाथ कदमने दिलेल्या माहितीनुसार, एका ट्रकने भरधाव वेगात कारला हुल दिल्यामुळे हा अपघात घडला. कदम यांनी सांगितले, 'आम्ही बीडवरून मुंबईला जात होतो. रस्त्यात एका ट्रकने आम्हाला हुल दिली. या ट्रकच्या बंपरमध्ये आमची कार अडकली. त्याच स्थितीत आमची कार काही अंतरापर्यंत फरफटत गेली. ही घटना पहाटे ५ च्या सुमारास घडली. पण मदत पोहोचण्यासाठी तासभर लागला. मी पोलिस नियंत्रण कक्षाला फोन केला. पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही. सकाळी ६ च्या सुमारास रुग्णवाहिका आमच्यापर्यंत पोहोचली.'

## सामाजिक प्रश्नांसाठी तीव्र भूमिका



विनायक मेटे अनेक वर्षे महाराष्ट्र विशेषत: मराठवाड्याच्या सामाजिक जीवनात सक्रीय होते. या क्षेत्रात त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. सामाजिक प्रश्नांसाठी त्यांच्या भूमिका तीव्र होत्या. आपल्या मागण्यांसाठी ते अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडती करत होते. सकाळी उठल्यानंतर सर्वात आधी मेटेंच्या निधनाचे वृत्त कळाले. त्यामुळे धक्काच बसला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विनायक मेटे यांचे कुटुंबीय व सहकाऱ्यांच्या दु:खात सहभागी आहे. *- शरद पवार, अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस*

## विश्वास बसत नाही



विनायक मेटे यांचे निधन झाले यावर माझा विश्वास बसला नाही. मराठा आरक्षणासाठी त्यांनी खूप संघर्ष केले. सातत्याने त्यांची तळमळ मला जाणवली. त्यांचा एकच ध्यास होता की, मराठा समाजाला न्याय मिळेल. आज अतिशय महत्वाची बैठक आम्ही ठेवली होती. मात्र, दुर्दैवाने त्यांचे निधन झाले आहे. सरकार त्यांच्या कुटुंबासोबत आहे. *- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री*

## त्यांचे जाणे खूप मोठे नुकसान



शेतकरी, शेतमजूर, गरीब आणि मराठा समाजाला न्याय देणारा नेते म्हणून मेटे यांची ओळख होती. राज्यात नवीन सरकार स्थापन झाले होते. त्यांना आता समाजासाठी खूप काही करण्याची संधी होती. मात्र, त्याचे अचानक जाणे हे खऱ्या अर्थाने एक खूप मोठे नुकसान आहे. *- विनोद तावडे, भाजप नेते*

## हा खूप मोठा धक्का

आज पहाटे पाच वाजता मी देखील मराठा समाजाच्या बैठकीसाठी निघालो होतो. आज दुपारी १२ वाजता सह्याद्रीवर बैठक होती. मेटे यांच्या चालकाचा मला सकाळी ५.१५ वाजता फोन आला. मेटे यांचे जाणे हा खूप मोठा धक्का आहे. १५ दिवसांपूर्वीच त्यांच्या वाढदिवसाला मी गेलो होतो. ते मराठा आरक्षणासाठी सातत्याने झगडत होते. काल रात्री त्यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बोलणे झाले. त्यांच्या असे जाणे अत्यंत दु:खत आहे. *- चंद्रकांत पाटील, कॅबिनेट मंत्री*

विनायक मेटे यांचे पहाटे निधन झाले. त्यात त्यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली होती. त्यांचे निधन घटनास्थळी झाले होते. त्यांना सकाळी ६.२० मिनिटांनी रुग्णालयात आणले असता, त्यांची तपासणी करण्यात आली, त्याआधीच त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर किरकोळ जखमी झाला असून एक पोलिस या अपघातात गंभीररित्या जखमी झाले आहेत. आमचे डॉक्टर त्यांना उपचार करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. त्यांच्या ड्रायव्हरची प्रकृती मात्र चांगली आहे.

*- कुलदीप सलगोतरा, एमजीएम हॉस्पिटल मेडिकल डायरेक्टर*

## हे अतिशय दुर्दैवी



खरोखर ही एक धक्कादायक अशी ही घटना आहे. मराठा समाजासाठी लोकहिताचे काम विनायक मेटे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांना प्रचंड अभिमान होता. अरबी समुद्रात शिवरायांचा पुतळा व्हावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. मराठा समाजासाठी दीर्घ काळ लढा त्यांनी दिला. त्यांचे असे अचानक निधन व्हावे, ही अतिशय दुर्दैवी आहे. *- दीपक केसरकर, कॅबिनेट मंत्री*

## मराठा समाजाला खूप मोठा तोटा

अत्यंत दु:खत आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. विनायक मेटे हे बेधडकपणे समाजाला न्याय देण्यासाठी आपली भूमिका नेहमी राबवत होते. मोजक्या आमदारांपैकी ते एक असे आमदार होते, जे की विधानपरिषदमध्ये आपली भूमिका स्पष्टपणे मांडायचे. समाजासाठी हा खूप मोठा तोटा आहे. हा तोटा भरून कसा आणता येईल हा मोठा प्रश्न आहे. *- संभाजीराजे छत्रपती, माजी खासदार*

## मेटेंचे जाणे दु:खद



विनायक मेटे यांची बातमी सकाळी मला मिळाली. अतिशय दुर्दैवी अशी घटना आहे. मेटे हे अतिशय जवळचे नेते होते. मराठा आरक्षणाच्या चळवळीत देखील ते खूप अभ्यासू होते. त्यामुळे त्यांचे जाणे हे अपेक्षित नव्हते, हे एक धक्कादायकच म्हणावे लागेल.

*- अशोक चव्हाण, काँग्रेस नेते*

## मराठा समाजाचे नुकसान



मराठा समाजाला एक मोठा धक्का मानला जातो. हा दुर्दैव असा आहे की, दोन वर्षांनंतर आज दुपारी १२ वाजता मराठा समाजाची बैठक पार पडणार होती. त्याच बैठकीसाठी ते निघाले होते. मराठा समाजासाठी कायम लढा देणारा हा आमदार हे मराठा महासंघाचे पदाधिकारी होते. त्यांच्या जाण्याचे मराठा समाजाचे प्रचंड नुकसान झाले आहे. हे नुकसान न भरता येण्यासारखे आहे.

- दिलीप पाटील, मराठा क्रांती मोर्चा समन्वय

## विनायक मेटेंच्या अपघाताची चौकशी होणार : मुख्यमंत्री

शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे यांच्या अपघाताची चौकशी केली जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर रविवारी पहाटे मेटेंचा अपघात झाला. मात्र, अपघातानंतर विनायक मेटेंना तातडीने मदत मिळाली नाही. ते काही तास घटनास्थळीच पडून होते, असा आरोप मेटेंसोबत असलेल्या सहकाऱ्याने केला आहे. त्यावर मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल, असे सांगितले.

### मेटेंचा अपघात की घातपात? अपघातावर संशयकल्लोळ

विनायक मेटे यांच्या अपघाती मृत्यूबद्दल मराठा समाजातील नेते व शिवसेनेने संशय व्यक्त केला आहे. विनायक मेटे यांना तातडीच्या बैठकीसाठी बीडहून मुंबईला बोलावले कुणी? कुणामुळे विनायक मेटे यांना रात्रीच मुंबईला निघावे लागले? असे प्रश्न या नेत्यांनी विचारले असून संपूर्ण घटनाक्रमावरच संशय व्यक्त केला आहे.

### बैठकीची वेळ कुणी बदलली?

कोल्हापूरमधील मराठा समाजाचे नेते दिलीप पाटील यांनी सांगितले की, आज मराठा आरक्षणाबाबत मुंबईत होणारी बैठक सुरुवातीला सायंकाळी ४ वाजता ठेवण्यात आली होती. काल सकाळी ११ वाजता मुंबईहून याबाबत निरोप आला होता. मात्र, अचानक संध्याकाळी ७ वाजता मुंबईहून पुन्हा निरोप आला की, बैठक दुपारी १२ वाजता ठेवण्यात आली आहे. विनायक मेटे तेव्हा बीडमध्ये एका बैठकीत होते. बैठक दुपारी १२ वाजता झाल्याचे कळताच त्यांनी रात्रीतून मुंबईला कसे येऊ, सध्या आपण बीडला आहोत, अशी अडचणही सांगितली होती. तरीही वेळ बदलण्यात आली नाही. ही बैठक घेण्यामागे कोण आहे. वेळ बदलण्यासाठी कुणाचा दबाव होता, याची चौकशी झालीच पाहिजे.

### सर्व घटनाक्रम संशयास्पद

शिवसेनेचे नेते अरविंद सावंत यांनी सांगितले की, राज्यात गेल्या महिनाभरापासून सरकारस्थापनेचा घोळ सुरु होता. त्यानंतर राज्यात नवीन सरकार सत्तेत आले, तेव्हा विनायक मेटे यांनी सरकारचे अभिनंदन करणारी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. मग अचानक त्यांना मुंबईत बोलावले कुणी? मराठा आरक्षणाबाबत ते सातत्याने आग्रही होते. मात्र, याशिवाय त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे या सर्व घटनाक्रमात संशय वाटतो. अपघाताबाबत त्यांच्या कार्यकर्त्यांनीदेखील संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे सरकारने उच्च अधिकाऱ्यांतर्फे या घटनेची चौकशी करावी. चौकशीतूनच सत्य काय ते समोर येईल. तसेच, विनायक मेटे सरकारवर नाराज होते का, याचाही तपास होणे आवश्यक असल्याचे सावंत म्हणाले.

### दोन तास मदत नाही

मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक आबासाहेब पाटील म्हणाले, मुख्यमंत्र्यांसोबत मराठा आरक्षणासाठी महत्त्वपूर्ण बैठकीसाठी राज्यभरातून कार्यकर्ते आले होते. मात्र या दरम्यान मेटे साहेबांच्या गाडीला अपघात झाला. अपघातानंतर दोन तास कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही. त्या ठिकाणी कोणतीही सुविधा मिळाली नाही. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. हा अपघात झालाय की घातपात, हे सरकारने तात्काळ जाहीर करावे.

## मेटेंच्या मृत्यूला केंद्र आणि राज्य सरकार जबाबदार

### छत्रपती संभाजीराजेंचा गंभीर आरोप

विनायक मेटेंच्या कारला अपघात झाल्यानंतर एक तास उशिराने मदत पोहोचली. याच कारणावरून छत्रपती संभाजी राजे यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप केला आहे. अपघात झाल्यावर आपत्कालीन मदत मिळावी यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे काय नियमावली आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या मृत्यूला संभाजी राजेंनी राज्य आणि केंद्र सरकारला जबाबदार धरले आहे. विनायक मेटे यांना मी श्रद्धांजली वाहतो. सरकारने जी चौकशी करायची आहे ती करावी. अपघात झाल्यानंतर मेटे यांना एक तास उशिराने आपत्कालीन मदत मिळाली. सरकारकडे आपत्कालीन सुविधा पुरवण्याची काय नियमावली आहे, असा सवाल त्यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला. मुंबई-पुणे या मार्गावर कायम रहदारी असते. येथे आपत्कालीन मदत पोहोचविणाऱ्या दोन ते तीन गाड्या असायला हव्यात. अशी अचानक घटना घडली तर मदत पोहोचावी म्हणून केंद्र तसेच राज्य सरकारने योग्य ती तरतूद करायला हवी,' अशी मागणीदेखील संभाजीराजे छत्रपती यांनी केली. विनायक मेटे मराठवाड्याचे सुपुत्र आणि मराठा समाजाची शान होते. आज ते आमच्यातून निघून गेले आहेत. हा आमच्यासाठी मोठा धक्का आहे. ही पोकळी कशी भरून निघेल याचे उत्तर आमच्याकडे नाही. बीडसारख्या ठिकाणी प्रतिकूल परिस्थितीतून ते आले. विनायक मेटे यांनी मराठा समाजाची बाजू प्रभावीपणे मांडली. मोठे बंधू म्हणून ते मला नेहमी सल्ला द्यायचे. सरकारवर दबाव टाकायचा असेल तर आपण एकत्र येणे गरजेचे आहे, असे ते नेहमी सांगायचे, असे म्हणत संभाजीराजे छत्रपती यांनी मेटेंच्या निधनानंतर दु:ख व्यक्त केले.

### विनायक मेटेंच्या गाडीच्या अपघातासाठी कारणीभूत ट्रक पालघरमधील, मालक ताब्यात, चालकाच्या शोधात पोलिस गुजरातला

शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे यांच्या गाडीच्या अपघातासाठी जो ट्रक कारणीभूत ठरला आहे त्याची ओळख पटली असून तो ट्रक पालघर जिल्ह्यातील कासा येथील असल्याचे समजते. या ट्रक मालकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून सध्या हा ट्रक गुजरातमध्ये असल्याने पोलिसांची एक तुकडी गुजरातला रवाना झाली आहे. या ट्रकचा नंबर DN ०९ P ९४०४ असा असून हा ट्रक आयसर कंपनीचा आहे. या ट्रक चालकाचे नाव उमेश यादव असे आहे. या तपासामुळे हा अपघात होता की घातपात याच्या तपासाला गती मिळणार आहे.


**बैंक ऑफ़ बड़ौदा / Bank of Baroda** (विजया VIJAYA, देना DENA)

**वाशिंद शाखा : दुर्वांकूर टेलेफोन कार्यालयाच्या समोर, श्रीराम नगर, वाशिंद (प), तालूका शहापूर, जिल्हा ठाणे, पिन ४२१ ६०४, भारत.**
**ईमेल आयडी : VASHID@bankofbaroda.com**

**ताबा सूचना**

(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट)च्या नियम ८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरित बँक ऑफ बडोदा, वाशिंद शाखा, दुर्वांकूर, श्रीराम नगर, शहपूर, वाशिंद पश्चिम, ठाणे महाराष्ट्र ४२१ ६०१ येथील प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (अॅक्ट क्र. ५४/२००२) अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सहवाचन अनुच्छेद १३(१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार श्री. असिफ अझिझ सैयद यांना खालील निर्देशित रक्कमेचे सूचनेमध्ये रक्कम रु. **१५,७८,३७६.५२ (रु. पंधरा लाख अठ्ठयाहत्तर हजार तीनशे शहात्तर व बावन्न पैसे मात्र)** दि. २९.०४.२०२२ अनुसार अधिक त्यावरील व्याज व अन्य प्रभार दि. ३०.०४.२०२२ पासून या रक्कमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दि. २९.०४.२०२२ जारी केली होती.

कर्जदार यांनी सदर रक्कमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने सदर सूचना वरील निर्देशित कर्जदार /हमीदार व अन्य आम जनतेस देण्यात येत आहे की, सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचन सदर अॅक्टच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा ताबा दि. १२ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्यात येईल.

विशेषत: कर्जदार/ हमीदार व आम जनतेस सूचना इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये व असा कोणताही व्यवहार हा बँक ऑफ बडोदा, वाशिंद शाखा, दुर्वांकूर, श्रीराम नगर, शहापूर, वाशिंद पश्चिम, ठाणे महाराष्ट्र ४२१ ६०१ येथे सदर रक्कमेच्या रक्कम **रु. १५,७८,३७६.५२ (रु. पंधरा लाख अठ्ठयाहत्तर हजार तीनशे शहात्तर व बावन्न पैसे मात्र)** दि. २९.०४.२०२२ अनुसार अधिक दि. ३०.०४.२०२२ पासूनचे व्याज व प्रासंगिक खर्च त्यावरील उद्भवलेले व्याज व अन्य प्रभार यांच्यासह रकमेच्या अधीन असेल.

कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे विवरण**

**फ्लॅट क्र. २०५, २ रा मजला, बी विंग, ड्रिम लँड पार्क, वाशिंद - ४२१ ६०४ चे समतुल्य गहाण.**

सीमा :
उत्तरेस : रोड
दक्षिणेस : ड्रिम लँड २
पूर्वेस : ड्रिम लँड १
पश्चिमेस : खुला प्लॉट

दि. १२.०८.२०२२
ठिकाण : वाशिंद

सही/-
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा



**इंडियन बैंक / Indian Bank**
इलाहाबाद / ALLAHABAD

ZONAL OFFICE MUMBAI : Manish Commercial Centre, 216 A, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai - 400 025
• Tel. No. (022) 2492 1986 / 2492 3246 • Fax No. (022) 2496 4644 E-mail : zo.mumwest@indianbankco.in

**POSSESSION NOTICE (FOR IMMOVABLE PROPERTY)**
**[Under Rule 8 (1) of Security Interest (Enforcement) Rules, 2002]**

**WHEREAS,** The undersigned being the **Authorised officer** of the **Indian Bank, Nalasopara West** appointed / designated under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act and in exercise of powers conferred under section 13 (12) read with rule 3 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 issued **Demand Notice dated 30.04.2022** calling upon **Mr. Dinesh Shivdas Patel (Borrower & Mortgagor) & Mrs. Pushpa Dinesh Patel (Guarantor) and Mr. Vinuj Nair (Guarantor)** to repay the amount mentioned in the notice being ₹ **11,77,875/- (Rs. Eleven Lacs Seventy Seven Thousand Eighty Hundred Seventy Five Only) within 60 days** from the date of receipt of the said notice.

The borrower having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower and the **public in general** that the undersigned has **taken possession** of the property described herein below in exercise of powers conferred on him under section 13(4) of the said Act read with rule 8 of the said rules, on this **10th Day of August of the year 2022.**

The borrower in particular and the **public in general** is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the **Indian Bank** for an amount of ₹ **11,77,875/- (Rs. Eleven Lacs Seventy Seven Thousand Eighty Hundred Seventy Five Only)** and interest and other charges thereon from date of demand notice.

The borrower's attention is invited to the provisions of sub-section (8) of section (13) of the Act, in respect of the time available, to redeem the secured assets.

**Description of Immovable Property:**

Equitable Mortgage of Flat No. C/102, 1st floor, Shree Rajhans Complex, Building No. 1, Sector III, Nilemore, Nalasopara West, Dist. Palghar-401 203 Admeasuring 865 sq. ft. (BUA) Survey No. 171, Plot No. 121 to 127, 166 to 169 Vill. Nilemore, Taluka Vasai, Dist. Palghar-401 203

Date : 10.08.2022
Place: Mumbai

Sd/-
Authorised Officer,
For Indian Bank



## विश्वप्रभा व्हेंचर्स लिमिटेड

सीआयएन : L51900MH1985PLC034965

कार्यालय क्रमांक ४, अविघ्न हाईट्स, सर्व्हे क्रमांक ४५, सर्वोदय पार्कच्या मागे, नांदिवली रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१

**३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरीक्षित वित्तीय निकालांचा सारांश**

(रुपये हजार मध्ये)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
| | | ३०.०६.२०२२ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०२१ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०२२ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०२१ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) |
| १ | कार्यान्वयनातून मिळालेले एकूण उत्पन्न (निव्वळ) | ७,१५६ | १०,७०९ | ३,१३२ | २६,९६१ | ७,१५६ | १०,७०९ | ३,१३२ | २६,९६१ |
| २ | निव्वळ नफा / (तोटा ) कालावधीकरिता (करपूर्व, अपवादात्मक बाबीं आणि / किंवा विशेष बाबींपूर्व ) | १,९१५ | (१,८५२) | ३८५ | (४,०९४) | १,८९० | (१,९२०) | ३५८ | (४,२७०) |
| ३ | निव्वळ नफा / (तोटा ) कालावधीकरिता करपूर्व (अपवादात्मक बाबीं आणि / किंवा विशेष बाबींच्या पश्चात) | १,९१५ | (१,८५२) | ३८५ | (४,०९४) | १,८९० | (१,९२०) | ३५८ | (४,२७०) |
| ४ | निव्वळ नफा / (तोटा ) कालावधीकरिता करपश्चात (अपवादात्मक बाबीं आणि / किंवा विशेष बाबींच्या पश्चात) | १,९१५ | (१,९५९) | ३८५ | (४,२०१) | १,८९० | (२,०२८) | ३५८ | (४,३७७) |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न ज्यात कालावधीकरिता नफा / (तोटा) करपश्चात) आणि अन्य सर्वंकष उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश आहे | १,९१५ | (१,९५९) | ३८५ | (४,२०१) | १,८९० | (२,०२८) | ३५८ | (४,३७७) |
| ६ | इक्विटी समभाग भांडवल (ज्याचे दर्शनी मूल्य रु १०/- प्रति समभाग इतके आहे) | १७,१५० | १७,१५० | २,४५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | २,४५० | १७,१५० |
| ७ | राखीव (गेल्यावर्षीच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शित करण्यात आलेला रिव्हॅल्युएशन रिझर्व्ह वगळून ) | | | | २४,९९३ | | | | २४,८२४ |
| ८ | प्रति समभाग अर्जन ( ज्याचे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु १० प्रति समभाग इतके आहे) (खंडित आणि अखंडित कार्यान्वयनासाठी) (ॲन्युअलाईझ केलेले नाही) | | | | | | | | |
| | अ. मूलभूत | १.१२ | (४.२७) | १.५७ | (९.१६) | १.१० | (४.४२) | १.४६ | (९.४९) |
| | ब. सौम्यीकृत | १.१२ | (४.२७) | १.५७ | (९.१६) | १.१० | (४.४२) | १.४६ | (९.४९) |

**सूचना :** वरील प्रमाणे देण्यात आलेला तपशील हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स ) नियम २०१५ चा नियम ३३ अनुसार स्टॉक एक्स्चेंज कडे सादर करण्यात आलेल्या तिमाही आणि वार्षिक निकालांच्या विस्तृत माहितीचा सारांश आहे. तिमाही आणि वार्षिक निकालांचा सविस्तर तपशील कंपनीचे संकेतस्थळ www.vishvprabhaventures.com येथे तसेच स्टॉक एक्स्चेंज बीएसई संकेतस्थळ www.bseindia.com येथे उपलब्ध आहे.

विश्वप्रभा व्हेंचर्स लिमिटेड यांच्या करिता
(यापूर्वीची ओळख विश्वप्रभा ट्रेडिंग लिमिटेड)

स्थळ : डोंबिवली, ठाणे
दिनांक : १४.०८.२०२२

मितेश ठक्कर
व्यवस्थापाकीय संचालक
(डीआयएन ०६४८०२१३)



